भाग २

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : २

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-२ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

वृत्तीतले परिवर्तन हा साधनेचा पुरावा आहे.[३१]

देवाबद्दलची कल्पना
विशुद्ध होत जाणे, हे
खऱ्या साधनाचे लक्षण
आहे.[३२]

अर्जुनासारखी आपली
स्थिती असेल तर
गीता अधिक कळते.[३३]

सुप्ताला प्रश्न नसतात,
जागृताला असतात.३४

सध्याच्या मनाचे
सर्व ऐकत जाण्यात
देहाच्या दास्यत्वाचा
धोका आहे.[३५]

मला समजते त्याच्या
पलीकडे ज्ञान आहे,
असे ज्याला वाटते,
तो श्रद्धावान.३६

प्रगतीसाठी परमार्थात केलेला प्रयत्न कधीही वाया जात नाही.[३७]

प्रपंचाची तीन प्रमुख वैशिष्ट्ये - मिश्रण, बदल, भ्रम.३८

परमार्थातल्या परीक्षा नकळत होत असतात.३९

कर्म करण्यापूर्वी,करताना
आणि नंतर माझ्या वृत्तीवर
काय परिणाम झाला हे
कर्मफलापेक्षा जास्त महत्त्वाचे
आहे.४०

इंद्रियांना स्थान असावे,
पण मान नको.४१

विवेक कळतो, पण
तो प्रत्यक्षात आणण्यासाठी
जी शक्ती लागते
ती म्हणजे वैराग्य.४२

समाधानी होण्यासाठी
ज्ञानी व्हावे किंवा
श्रद्धावान तरी.४३

जो घटनेच्या पलीकडे
जाऊन विचार करतो,
तो परमार्थी.४४

संशय ही
आपल्या पायात
आपणच घातलेली
बेडी आहे.४५

गुरूंच्या इच्छेने आपण
परमार्थ केला म्हणजे
आपल्या कल्याणाचा प्रपंच
भगवंताला करावा लागतो.४६

ज्याचा
आनंद मार्गी लागला आहे,
त्याचेच
खरे मार्गी लागले आहे.४७

अनेक कर्मे करता करता
अनुभवीपणाचा लेप
चित्ताला लागतो,
त्याने अहंकार वाढतो.४८

साधनेनंतर मी किती चांगला आहे, असे वाटू लागले तर आपले काही खरे नाही, हे ओळखावे.४९

मनाचा
हात सोडल्याखेरीज
आनंद नाही.५०

अशांततेच्या प्रसंगांकडे
शिकण्याची संधी
म्हणून पहावे.५१

आपल्या खऱ्या स्वभावाचे दर्शन घडणे, हा कर्माचा महत्त्वाचा उपयोग आहे.[५२]

दुसऱ्याच्या हिताचा विचार व कृती ही रामचिंतनाची सुरुवात आहे.[५३]

प्रपंचाच्या धंद्याचा
खरा फायदा
समाधानात मोजावा.५४

जो घरात असतो,
पण मीपणाने नसतो
तो सर्वांना आवडतो.५५

‘मी व माझे’ सोडायची आपली किती तयारी आहे, त्यावर सत्यदर्शन अवलंबून आहे. ५६

माझ्या विपरीत कल्पनाच
अनेकदा माझ्या प्रगतीच्या
आड येतात, म्हणून
गुरुआज्ञापालन महत्त्वाचे.५७

सत्याचे ज्ञान व स्वीकार
जेथे आहे, तो ब्राह्मण.५८

सावधानता नसल्याने
चिंतनशक्ती वाया जाते.५९

रामाच्या मार्गाने आत्माराम
गाठणे हा सामान्यांच्या
हिताचा मार्ग आहे.[६०]

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *